पारावरच्या गप्पा

# विजेच्या बंद डीपीचा मामला पिकाचा जीव कधीचा तहानला!



देवदर्शन आटोपून गणपत पारावर बसला होता. उन्हाळा सुरू झाल्यामुळे कामे कमी असली तरी पिकांना पाणी देण्याचे महत्त्वाचे काम मात्र सुरू होते. अशातच शेतीला वीजपुरवठा करणारी डीपी बंद झाल्यामुळे तो निराश झाला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येऊन म्हणाला, ''का रं गंपा, आज फार निवांत! काही काम नाही काय?''

यावर वैतागून गणपत म्हणाला, ''कारं संपा, कशाला सकाळी सकाळी माझं डोकं गरम करतोय? बस थोडं निवांत. डोकं शांत करायलाच बसलोय इथं.''

यावर संपत म्हणाला, ''का रं, काय झालं तुझं डोकं गरम व्हायला? सकाळी सकाळी बायकोबरोबर भांडण केलं काय?''

यावर मात्र गणपत आणखीनच चिडून म्हणाला, ''अरं बाबा संपा, बायकोबरोबर भांडायला अंगात ताकद तर राहायला पाहिजे ना! एकतर कडक उन्हाळा सुरू झाला. पिकं पाण्यावाचून आडवी पडायला लागली. बरं रात्री- अपरात्री कधीही लाईट आली तरी बिबट्याची भीती असूनही पाणी भरायला जातोय. पण आता तर या वीज कंपनीने आमची डीपीच बंद केली. तीन दिवस झाले. वीज बिल भरा नाही तर डीपी जोडून देणार नाही, असं म्हणते कंपनी! बरं माझं एकट्याचं बिल भरून जमणार आहे काय? आता सर्वांनी बिलं भरली तरच डीपी जोडून देणार आहेत. म्हणून वैतागलो बघ. पिकाकडे बघवत नाही संपा. विहिरीत पाणी आहे. यावर्षी चांगली पिके आली होती. परंतु आता या लाईटने घोळ केल्यामुळे डोकं काही चालत नाही बघ. म्हणून म्हटलं चला जाऊन बसावं पारावर शांत.''

गणपतच्या या बोलण्यावर संपत होकारार्थी उत्तर देत म्हणाला, ''तुझं बरोबर आहे गंपा. आमचीही डीपी बंद केली होती. मीच पुढाकार

घेऊन आमच्या डीपीवरच्या सर्वांची चालू बिलं भरून डीपी सुरू करून घेतली. पण दोन- तीन दिवस मात्र लाईट नव्हती म्हणून पिकांना पाण्याचा ताण पडलाच. आपण तरी काय करायचं गंपा! सरकार जे नियम काढेल ते करावंच लागेल. नाही केलं तर आपलंच नुकसान होतं. आता हेच बघ. पाणी असून पाणी देता आलं नाही. पिकं पाण्याला तहानली. त्यामुळे उत्पादन कमी आले तर सरकार काय भरपाई देणार आहे काय? त्यामुळे आलेल्या प्रत्येक समस्येवर रडत बसण्यापेक्षा त्यावर तोडगा काढून पुढे जात राहाणं हेच आपल्या नशिबात आहे, त्याला काय करणार?''

यावर मात्र गणपत आणखीनच वैतागला व म्हणाला, ''हे बघ संपा, आपलंच नशीबच फुटकं! दोन- तीन वर्षांपासून दुष्काळ होता. पाणी नव्हतं. पिकाचे उत्पादन आले नाही. मात्र मागील वर्षी चांगला पाऊस झाला. पिकं चांगली आली तर मध्येच कोरोनाने डोकं वर काढलं. उत्पादन मिळाले पण त्याचे पैसे काही चांगले आले नाही. यावर्षीही पाणी चांगले आहे. पिकं चांगली आहेत. आता या विजेचं संकट मध्येच आडवं आलं. आता तूच सांग, चार वर्षांचे थकलेले लाईटबिल पन्नास हजार ते लाख रुपयांच्या घरात आहे. एवढे पैसे जर लाईटबिल भरायला दिले तर घरच्यांना काय माती घाऊ घालू काय? बरं, प्रत्येक राजकारणी माणूस इलेक्शन आले की लाईटबिल माफ, कर्ज माफ, फुकट लाईट यासारख्या घोषणा करणार. त्यामुळे आपणही थोडं थोडं असणारं लाईटबिल भरण्याचं टाळतो आणि त्यांनी सरकार स्थापन केलं की सुरू होते लाईटबिल वसुली! मग तूच सांग संपा, सरकारला एक ठोस धोरण नको का घ्यायला? तुला सांगतो संपा, मी मागील चार वर्षांपासून कधीही लाईट बिल थकवले नाही पण राजकारण्यांच्या या खोट्या आश्‍वासनांमुळे वीज बिल थकले आणि आता डीपी कट झाली. मग तूच सांग, यामध्ये दोष कोणाचा आहे? सुरुवातीला वाईट सवयी लावून घ्यायला भाग पाडायचे आणि नंतर त्याच सवयी मोडण्यासाठी शिक्षा करायची! हा कोणता न्याय आहे?''

गणपतच्या या तळमळीच्या पण सत्य बोलण्यावर संपत फक्त मानच डोलावू शकत होता. कारण प्रत्येकाच्या मनातलं गणपत बोलत होता!

तरी संपत म्हणाला, ''ठीक आहे गंपा. तू म्हणतो ते अगदी १०० टक्के बरोबर आहे. पण आता हे बोलून काय डीपी जोडली जाणार आहे काय? यामुळे सरकार- पुढारी यांच्या वागण्यात काही बदल होणार आहे काय? शेवटी आपली पोळी आपल्यालाच भाजावी लागेल! बिल भरलं नाही तर डीपी सुरू नाही. डीपी सुरू नाही तर पीक वाचणार नाही. मग पुढे काय?''

यावर गणपतही हतबल होऊन म्हणाला, ''ठीक आहे संपा. तू म्हणतो ते खरं आहे. पण एक सांग, आपण यापूर्वीही वेळेवर वीज बिल भरायचो. पण त्यानुसार आपल्याला त्यांच्याकडून सेवा मिळते काय? वीज बिल भरूनही आपल्याला रात्री का म्हणून लाईट देतात? रात्री शेतीत पाणी भरायचे म्हणजे अनेक अडचणी आणि बिबट्याच्या भीतीने प्राण संकटात घालून पाणी द्यावे लागते. मग दिवसा का नाही लाईट? बरं पाऊस चालू असताना मोटारी बंद. उन्हाळ्यात विहिरीला पाणी नाही म्हणून मोटारी बंद. थंडीमध्ये पिकाला पाण्याची गरज नसते म्हणून मोटारी बंद. एकतर दिवसातून आठ तास

लाईट. त्यामध्येही वर्षातील ३६५ दिवसांतून १५०- २०० दिवस मोटारी बंद असतात किंवा एक-दोन तास चालतात. तरी वीज बिल चालू! बरं अनुदानावर लाईट दिली जाते असे म्हणतात. पण शासनाकडून शेतकऱ्यांच्या नावावर अनुदान घेतातच ना! बरं वीज कंपनीची सेवा म्हणजे विचारायलाच नको. डीपीचा फ्यूज गेला, लिंक गेला. सांग बरं कधी वायरमन आला आणि त्याने फ्यूज, लिंक टाकला? सर्व काही आम्ही करायचे. डीपी जळाली, ऑईल कमी झाले- काढा वर्गणी आणि करा नीट. साधी सर्व्हिस वायर तुटली किंवा वायर बदलण्याची वेळ आली तरी आपणच वायर आणा. वायरमन काही पोलवर चढत नाही. त्याचा सहकारी असतो. तो पोलवर चढतो. त्याचे वेगळे पैसे द्या आपणच. आरे संपा, आपण जर वीज बिल भरत असू तर मग या सर्व सेवा नको का द्यायला वीज कंपनीने? मागे आमच्या डीपीकडून जाणाऱ्या सर्व तारा लोंबकळून खाली आल्या. त्यामुळे एकाचा ऊस पेटला. आम्ही कंपनीला कळविले तर काहीही कार्यवाही झाली नाही. शेवटी आम्ही सर्वांनी वर्गणी काढून सर्व तारा ओढून घेतल्या. जेणेकरून पुढे परत अशा घटना घडणार नाही. अरे संपा, डीपीच्या कटआऊटच्या फ्यूजवायर टाकायला आम्हाला वर्गणी काढावी लागते; तर इतर बाबींबद्दल न बोललेलेच बरे. मग सांग, अशी सेवा दिल्यानंतरही तूच म्हणतो की आधी वीज बिल भरा नाही तर डीपी चालू होणार नाही.''

गणपतच्या या बोलण्यामुळे संपतही विचारात पडला. डोकं खाजवून तो म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो हे सर्व खरंय. पण आता 'कोंबडी आधी की अंडं आधी' या प्रश्नात अडकून आपलेच हाल होत आहेत बघ. तिकडे कंपनी म्हणते, आम्ही तोट्यात आहोत, वीजपुरवठा करता येणार नाही. सरकार म्हणते की, कंपनी वाचवायची असेल तर वीज बिल भरा. आपणही म्हणावे की पीक वाचवायचे असेल तर डीपी सुरू झाली पाहिजे. डीपी सुरू होण्यासाठी पैसे भरावे लागतीलच. खरं तर प्रत्येकाचे बरोबर आहे. परंतु जी पद्धत किंवा प्रथा सुरू आहे त्यामध्ये बदल होण्याची गरज आहे. पाणी असो वीज असो, यासाठी शेती म्हणजे शेवटचा प्राधान्यक्रम! असं का, तर कमी किंमतीमध्ये शेतीला या बाबी द्याव्या लागतात म्हणून! खरं तर पाणी, वीज शेतीसाठी कमी किंमतीला देऊन शेतकऱ्यांवर उपकार केल्याचे दाखविण्यापेक्षा या किंमती उत्पादन खर्चात धरून शेती उत्पादनाला तसा वाढीव दर द्या. मग बघा पाणी, वीज यांचा प्राधान्यक्रम कोठे येईल आणि सेवा कशा मिळतील ते! प्रगत देशांमध्ये शेती प्राधान्यक्रमावर- एक नंबरवर असते आणि आपले मात्र उलटे गणित. पण ठीक आहे गंपा, पहिल्यापासूनच देशाच्या प्रगतीमध्ये शेतीचा किती हिस्सा याबद्दल कोणीही बोलत नसले तरीही शेती- शेतकऱ्यांना कायमच आर्थिकदृष्ट्या कमकुवत ठेवून देशातला महागाईचा उच्चांक वाढू न देणे आणि विकासाचा दर वाढविणे या मंडळींना शक्य झाले आहे! त्यामुळे आपण सर्वांसाठीच 'बळी जाणारा राजा' ठरलो आहोत. म्हणूनच शेतकऱ्याला 'बळीराजा' उपमा आहे! चल बोलत नको बसू. लाईटबिल भरून ये आणि पिके पाण्यासाठी तहानली आहेत ती वाचव. नाही तर आपल्याला कोणीच वाचवणार नाही. चला आता कामाला लागू!

**(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**